# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 12-01-2024

नागपूर(महाराष्ट्र) मध्ये मौदा ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2024-01-12 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

| हवामान घटक | 2024-01-13 | 2024-01-14 | 2024-01-15 | 2024-01-16 | 2024-01-17 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 29.4 | 29.9 | 30.3 | 30.7 | 30.8 |
| किमान तापमान (अं.से) | 16.1 | 15.8 | 14.6 | 14.3 | 14.4 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 78 | 76 | 75 | 73 | 71 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 54 | 53 | 51 | 52 | 50 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 6 | 6 | 6 | 6 | 6 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 30 | 50 | 25 | 57 | 52 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 1 | 1 | 1 | 1 | 1 |

### हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक १३ ते १७ जानेवारी २०२४ दरम्यान आकाशआंशिक ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक १३, १४, १५, १६ व १७ जानेवारी २०२४ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यतावर्तविण्यात आली आहे. • विदर्भामध्ये पुढील ५ दिवसामध्ये कमाल तापमानामध्ये फारसा बदल होणार नाही. • विदर्भामध्ये पुढील ३ दिवसामध्ये किमान तापमानामध्ये २ ते ३ अंश सेल्सिअस ने घट होईल त्या नंतर फारसा बदल होणार नाही.

### कृषि सल्ला:

• पुढील ५ दिवसाकरिता कोरड्या हवामानाचा अंदाज लक्षात घेता पुढील ५ दिवसामध्ये परिपक्व अवस्थेतील तूर व इतर पिकाची कापणी आणि मळणी सुरु ठेवावी. • किमान तापमानातील अंदाजित घट लक्षात घेता, हंगामी पिके, फळपिके व भाजीपाला पिकामध्ये ठिबक सिंचन/तुषार सिंचन पद्धतीद्वारे हलके ओलीत करावे. फळबागा व भाजीपाला पिकास पीक आच्छादन करावे, जेणेकरून जमिनीचे तापमान वाढण्यास व जमिनीतील ओलावा राखून ठेवण्यास मदत होईल. • उर्वरित कपाशीची वेचणी उरकून घ्यावी व शेवटच्या वेचनिनंतर पुढील हंगामात गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी कपाशीचे पिक काढून टाकावे.रोगग्रस्त बोंडे व पिकाचे इतर अवशेष शेताबाहेर नष्ट करावे. • पुढील ५ दिवस कोरड्या हवामानाचा अंदाज लक्षात घेता, आंतरमशागतीची कामे, कृषी रसायनांच्या (कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी) फवारणी ची कामे तसेच उभ्या पिकामध्ये खते देण्याची कामे सुरु ठेवावी. • हरभरा पिकामध्ये अधिकतम उत्पादनासाठी पहिले ओलीत पेरणीनंतर ३० ते ४० दिवसांनी म्हणजेच पिक फुलोरा अवस्थेत असताना द्यावे तर दुसरे ओलीत पेरणीनंतर ६० ते ७० दिवसांनी म्हणजेच घाटे भरण्याच्या अवस्थेत द्यावे. • घाटे अळीच्या एकात्मिक व्यवस्थापनासाठी शेतामध्ये प्रती हेक्टरी २० पक्षीथांबे लावावे. घाटे अळीच्या नियंत्रणासाठी कामगंध सापळे (हेक्झाल्युर) एकरी दोन किंवा हेक्टरी पाच लावावेत. सापळ्यामध्ये सतत तीन दिवस आठ ते दहा पतंग आढळल्यास व्यवस्थापनाच्या उपाययोजना कराव्यात. पिकाचे निरीक्षण करून किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किंवा पिक ४० ते ५० % फुलोरा अवस्थेत असताना सर्वप्रथम वनस्पतीजन्य किंवा जैविक किटकनाशकांना प्राधान्य द्यावे. त्यासाठी पहिली फवारणी निंबोळी अर्क ५ % किंवा अझाडिरेकटीन ३०० पीपीएम ५० मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून नापस्याक पंपाने फवारणी करावी. पावर स्प्रेयर ने फवारणी करायची असल्यास किटकनाशकाची मात्रा तीन पट करावी. किडीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास क्विनालफॉस २५ टक्के ईसी २० मिली किंवा ईमामेक्टिन बेन्झोएट ५ % एसजी ३ ग्राम किंवा फ्ल्यूबेंडीअमाईड २० % डब्ल्यूजी ५ ग्राम किंवा क्लोरॅंट्रानिलिप्रोल १८.५ एससी २.५ मिली प्रती १० लिटर पाण्यत मिसळून फवारणी करावी. हरभरा पिक २० ते ३० दिवसाच्या अवस्थेत असताना पाणी व अन्नद्रव्यासाठी पिकाची तनासोबत स्पर्धा टाळण्यासाठी दोन वेळा खुरपणी व कोळपणी करावी. • पुरेश्या ओलिताची व्यवस्था असल्यास गहू पिकास, पहिले ओलीत मुकुट मुळे फुटण्याची अवस्था (पेरणीनंतर १८-२० दिवस), दुसरे ओलीत जास्तीत जास्त फुटव्याच्या अवस्थेत (पेरणीनंतर ३० ते ३५ दिवस), तिसरे ओलीत कांडी धरण्याच्या उशिरा अवस्थेत (पेरणीनंतर ४५ ते ५० दिवस), चौथे ओलीत फुलोरा अवस्थेत (पेरणीनंतर ६५ ते ७० दिवस), पाचवे ओलीत दाण्याची दुधाळ अवस्था (पेरणीनंतर ८० ते ८५ दिवस) असताना करावे.

### संक्षिप्त संदेश सल्ला:

• हरभरा पिकास आवश्यकतेनुसार तुषार सिंचन पद्धतीद्वारे ओलीत करावे तसेच पिक क्षेत्रात ओलिताचे पाणी साचून राहणार नाही कटाक्षाने काळजी घ्यावी.

### पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| भुईमूग | ओलिताचे पाणी उपलब्ध असल्यास उन्हाळी भुईमुगाची पेरणी जानेवारी च्या दुसऱ्या पंधरवड्यात रुंद वाफा व सरी पद्धतीने तुषार सिंचनाखाली करावी. टीएजी- २४ किंवा एसबी- ११ या जातीचे हेक्टरी १२५ किलो बियाणे वापरावे. प्रती किलो बियाण्यास ट्रायकोडर्मा ५ ग्राम, रायझोबियम २५ ग्राम, पीएसबी २५ ग्राम या जीवाणू संवर्धनाची बीज प्रक्रिया करून पेरणी करावी.उन्हाळी हंगामात टीएजी- २४ हा वाण ३० x १० सेंमी व एसबी-११ हा वाण ३० x १५ किंवा ४५ x १० सेंमी अंतरावर पेरावा. |
| तूर | • परिपक्व अवस्थेतील तूर पिकाची काढणी करून घ्यावी व काढणी आणि मळणी केलेले पिक सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी साठवणूक करावी. |
| हरभरा | • हरभरा पिकामध्ये अधिकतम उत्पादनासाठी पहिले ओलीत पेरणीनंतर ३० ते ४० दिवसांनी म्हणजेच पिक फुलोरा अवस्थेत असताना द्यावे तर दुसरे ओलीत पेरणीनंतर ६० ते ७० दिवसांनी म्हणजेच घाटे भरण्याच्या अवस्थेत द्यावे. • हरभरा पिकामध्ये मर रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पिकात दीर्घकाळ पाणी साचून राहणार नाही यासाठी पिकास जास्त काळ ओलीत करणे टाळावे व ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची ४० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून जमीनीवर फवारणी करावी किंवा आवळणी करावी किंवा थायोफिनेट मिथाईल ७० डब्लूपी २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • घाटे अळीच्या एकात्मिक व्यवस्थापनासाठी शेतामध्ये प्रती हेक्टरी २० पक्षीथांबे लावावे. घाटे अळीच्या नियंत्रणासाठी कामगंध सापळे (हेक्झाल्युर) एकरी दोन किंवा हेक्टरी पाच लावावेत. सापळ्यामध्ये सतत तीन दिवस आठ ते दहा पतंग आढळल्यास व्यवस्थापनाच्या उपाययोजना कराव्यात. पिकाचे निरीक्षण करून किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किंवा पिक ४० ते ५० % फुलोरा अवस्थेत असताना सर्वप्रथम वनस्पतीजन्य किंवा जैविक किटकनाशकांना प्राधान्य द्यावे. त्यासाठी पहिली फवारणी निंबोळी अर्क ५ % किंवा अझाडिरेकटीन ३०० पीपीएम ५० मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून नापस्याक पंपाने फवारणी करावी. पावर स्प्रेयर ने फवारणी करायची असल्यास किटकनाशकाची मात्रा तीन पट करावी. किडीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास क्विनालफॉस २५ टक्के ईसी २० मिली किंवा ईमामेक्टिन बेन्झोएट ५ % एसजी ३ ग्राम किंवा फ्ल्यूबेंडीअमाईड २० % डब्ल्यूजी ५ ग्राम किंवा क्लोरॅंट्रानिलिप्रोल १८.५ एससी २.५ मिली प्रती १० लिटर पाण्यत मिसळून फवारणी करावी. हरभरा पिक २० ते ३० दिवसाच्या अवस्थेत असताना पाणी व अन्नद्रव्यासाठी पिकाची तनासोबत स्पर्धा टाळण्यासाठी दोन वेळा खुरपणी व कोळपणी करावी. |
| गहू | • गहू पिकास पेरणीनंतर १८ ते २० दिवसानंतर मुकुट मुळे फुटण्याच्या अवस्थेत पहिले पाणी द्यावे. या अवस्थेत पाण्याचा ताण बसल्यास ३३ टक्के पर्यंत उत्पादनात घट येऊ शकते. • गहू पिकास मर्यादित सिंचनाची उपलब्धता लक्षात ठेऊन, एकाच ओलिताची व्यवस्था असल्यास पेरणीनंतर ४२ दिवसांनी, दोन ओलिताची व्यवस्था असल्यास २१ व ६५ दिवसांनी व तीन ओलिताची व्यवस्था असल्यास २१, ४२ आणि ६५ दिवसांनी ओलीत करावे. • पुरेश्या ओलिताची व्यवस्था असल्यास गहू पिकास, पहिले ओलीत मुकुट मुळे फुटण्याची अवस्था (पेरणीनंतर १८-२० दिवस), दुसरे ओलीत जास्तीत जास्त फुटव्याच्या अवस्थेत (पेरणीनंतर ३० ते ३५ दिवस), तिसरे ओलीत कांडी धरण्याच्या उशिरा अवस्थेत (पेरणीनंतर ४५ ते ५० दिवस), चौथे ओलीत फुलोरा अवस्थेत (पेरणीनंतर ६५ ते ७० दिवस), पाचवे ओलीत दाण्याची दुधाळ अवस्था (पेरणीनंतर ८० ते ८५ दिवस) असताना करावे. |
| गहू | • सद्य परिस्थितीतील ढगाळ वातावरणामुळे गहू पिकामध्ये मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी थायमेथोक्झाम २५ % डब्ल्यूजी १० ते १५ ग्राम किंवा क्विनालफॉस २५ % प्रवाही ईसी ४० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. सद्य परिस्थितीतील ढगाळ वातावरणामुळे गहू पिकामध्ये तांबेरा आणि पानावरील करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास मॅनकोझेब ७५ % डब्ल्यूपी २० ते २५ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. गहू पिकामध्ये उंदीर व्यवस्थापनासाठी विषयुक्त आमिषाचा वापर करावा. विषयुक्त आमिष तयार करण्यासाठी धान्याचा भरडा ४९ भाग, थोडे गोडे तेल व १ भाग ब्रोमाडीओलोन ०.२५ % सीबी एकत्र मिसळावे. चमचाभर आमिष प्लास्टिकच्या पिशवीत टाकून शेतातील जिवंत बिळामध्ये टाकावे किंवा बिलाजवळ ठेवावे. |
| मोहरी | • ढगाळ हवामान आणि रात्रीचे कमी तापमान मोहरीमध्ये मावा प्रादुर्भावास अनुकूल आहे. मावा प्रादुर्भावाच्या नियंत्रणासाठी थायोमेटॉन २५ ईसी ८ मि.ली प्रति १० लिटर पाण्यात किंवा डायमेथोएट ३० ईसी १० मि.ली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पिकाला संरक्षित ओलीत द्यावे तसेच एक सिंचन सोय उपलब्ध असल्यास फुल अवस्थेत, दोन सिंचन सोय उपलब्ध असल्यास ३० दिवसांनी पीक अवस्थेत आणि फुल अवस्थेत व जिथे तीन सिंचन सोय उपलब्ध असल्यास २५-३० दिवसांच्या अंतराने पिकाला संरक्षित ओलीत द्यावे. |
| करडई | • कोरड्या हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन, करडईच्या इष्टतम उत्पादकतेसाठी गरजेनुसार सिंचन करा. एक सिंचन शेड्यूल उपलब्ध असल्यास ते ५० दिवसांच्या पीक टप्प्यावर, दोन सिंचन उपलब्धतेसाठी ३० आणि ५० दिवसांच्या पीक अवस्थेत, तीन सिंचन उपलब्धतेसाठी ३०, ५० आणि ६५ दिवसांच्या पीक अवस्थेवर शेड्यूल करा. • करडई पिकामध्ये ढगाळ वातावरणामुळे मावा किडीचा प्रादुर्भाव (आर्थिक नुकसान पातळी- ३० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे) दिसून आल्यास डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १३ मि. ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मोसबी | • संत्रा व मोसंबी: ठिबक संच असल्यास १ ते ४, ५ ते ७ व ८ वर्षावरील झाडांना अनुक्रमे ७ ते 30, ४४ ते ७२ आणि ८२ ते १०२ लिटर प्रती दिवस जमिनीनुसार पाणी द्यावे. ठिबक संच नसल्यास दुहेरी आळे पद्धतीने ८ ते १० दिवसाच्या अंतराने ओलीत करावे. संत्रा पिकाच्या झाडाच्या बुडाजवळ पूर्वी केले नसल्यास आच्छादन करावे. आच्छादन करण्यासाठी गवत, गव्हाचा भुसा झाडाच्या खोडाजवळ टाकावा. आंबिया बहार सुरू करण्यासाठी जमिनीच्या प्रकारानुसार आणि झाडांना मिळालेला ताण यानुसार बागेला ओलीत करावे. • फळ बागेमध्ये पाणी दिल्याबरोबर ताण तुटतो व नवीन पालवी किंवा नवतीची सुरुवात होते. या वेळी सिट्रस सिला व त्याची पिल्ले पानातील रस शोषून घेतात. नवतीच्या पानाची गळ होऊन फांद्या सुकतात व फळधारने वर अनिष्ठ परिणाम होतो. ह्या किडीद्वारे "ग्रीनींग" या रोगाचा प्रादुर्भाव होतो. या किडीच्या व्यवस्थापनासाठी डायमेथोएट ३० ईसी २ मिली किंवा एसिफेट ७५ % एसपी २ ग्राम किंवा इमिडाक्लोप्रीड १७.८ एसएल ०.५ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून नवीन नवतीवर फवारणी करावी. दुसरी फवारणी १० दिवसानंतर कीटकनाशकाची आलटून पालटून फवारणी करावी. • आंबिया बहाराच्या वेळी जिबरेलिक आम्ल १.५ ग्राम सोबत १ किलो युरिया १०० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी. • संत्रा झाडाच्या खुंटामधून डिंकाचा स्त्राव दिसून आल्यास असा डिंक तीक्ष्ण चाकूने खरडून टाकावा व ती जागा पोटॅशियम |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | परमॅग्नेट १० ग्राम १ लिटर पाणी या प्रमाणात केलेल्या द्रावणाने धुवावे व त्या ठिकाणी मेफेनोक्सम एमझेड ६८ (मेटालिक्सील एम ४ % + मॅन्कोझेब ६४ % डब्ल्यूपी) किंवा फोसेटील- एएल या अमलाची पेस्ट लावावी. |
| ऊस | • ओलिताची व्यवस्था असल्यास ठिबक सिंचन व जोड ओळ पद्धतीने सुरू उसाची लागवड करावी. त्यासाठी बेणे प्रक्रिया अवश्य करावी. सुरू उसामध्ये उन्हाळी भुईमूग , कांदा व पानकोबी, फुलकोबी इत्यादी आंतरपीके घ्यावी. |
| कपाशी | • ज्या भागात कापूस पिक पिकाची बोंडे फुटून कापूस बाहेर पडण्याच्या अवस्थेत आहे तेथे शेतकरी बांधवांनी कपाशीच्या वेचनीच्या कामाला प्राधान्य द्यावे. वाणानुसार वेचणी केलेला कापूस कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावा. कापूस वेचणी व साठवणुकीसाठी व पुढील संक्रमणाचे नुकसान टाळण्यासाठी प्लास्टिक/गोणपाटाच्या पिशविऐवजी कॉटन पिशव्याचा वापर करावा. • पुढील हंगामामध्ये कपाशी पिकामध्ये गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी डिसेंबर अखेर कापूस वेचणी पूर्ण करावी. |

**फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:**

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| टरबूज | • उन्हाळी हंगामात टरबूज पिकाची लागवडी साठी शुगर बेबी, असाही यामाटो, अर्का ज्योती, अर्का माणिक या वाणाची निवड करावी. लागवडीवेळी ४० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ४० किलो पालाश द्यावे व ४० किलो नत्र लागवडी नंतर ३० दिवसांनी द्यावे. |
| खरबूज | • उन्हाळी हंगामात खरबूज पिकाच्या लागवडीसाठी हरा मधु, पुसा शरबती, पंजाब सुनहरी, अर्का राजहंस, अर्का जीत, पुसा मधुरस या वाणाची लागवड करावी. लागवडीवेळी ४० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ४० किलो पालाश द्यावे व ४० किलो नत्र लागवडी नंतर ३० दिवसांनी द्यावे. |
| अळशी | • सततच्या ढगाळ हवामानामुळे जवस पिकावर रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता लक्षात घेता नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मिली किंवा क्विनालफॉस ३५ टक्के प्रवाही २० मी. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. |
| कांदा | • कांदा पिकाची सहा ते आठ आठवड्याचे रोपे सपाट वाट्यामध्ये दहा बाय दहा सेंटिमीटर अंतरावर जानेवारीच्या पहिल्या पंधरवड्यात लागवड करावी. |
| मिरची | • मिरची पिकावरील पानावरील ठिपके रोगास थंड, दमट स्थिती आणि मध्यम तापमान रोगास अनुकूल आहे. मिरचीच्या पिकावर पानावर ठिपके रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास कॉपर ऑक्सीक्लोराईड ५० % डब्ल्यूपी @ १००० ग्रॅम प्रति एकर ३०० ते ४०० लिटर पाणी किंवा मॅन्कोझेब ७५ % डब्ल्यूपी @ ६००-८०० ग्रॅम प्रति एकर ३०० लिटर पाणी किंवा हेक्साकोनाझोल ७५ % डब्ल्यूजी @ २७ ग्रॅम प्रति एकर प्रति २०० लिटर पाणी किंवा क्रेसॉक्सिम-मिथाइल १५ % + क्लोरोथॅलोनिल ५६ % डब्ल्यूजी @ ४०० ग्रॅम प्रति एकर प्रति २०० लिटर पाणी किंवा कार्बेन्डाझिम १२ % + मॅन्कोझेब ६३ % डब्ल्यूपी @ ३०० ग्रॅम प्रति एकर प्रति २०० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान असताना फवारणी करावी. |
| वांगे | • वांगी पिकावरील फळे आणि शेंडा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी साप्ताहिक अंतराने बॅसिलस थुरिंगिएन्सिस फॉर्म्युलेशन १ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • ट्रायकोग्रामा चिलोनिस अंडी कार्ड (२,५०,०००/हेक्टर) (५०,०००/रिलीज) ५ वेळा साप्ताहिक अंतराने, फुले लागण्याच्या सुरुवातीपासून) सोडावी. • प्रती एकर १० कामगंध सापळे लावावेत. रासायनिक कीटकनाशकाद्वारे नियंत्रणासाठी क्लोरॅंट्रानिलिप्रोल १८.५ एससी०.३ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| टोमॅटो | • मागील आठवड्यातील ढगाळ हवामानामुळे टोमॅटो पिकावर उशिरा येणाऱ्या करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी स्वच्छ हवामन परिस्थिती असताना कॉपर ऑक्सिक्लोराईड (३.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मॅन्कोझेब (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा बोर्डो मिश्रण (१ %) किंवा कॉपर हायड्रॉक्साईड (२.० ग्रॅम/लि.) किंवा फोसेटील एएल ( ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा डायमिथोमोर्फ (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा पुर्वमिश्रित बुरशीनाशक पायराक्लोस्ट्रोबिन + मेटीराम (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मेफेनोक्झाम + कॉपर ऑक्सिक्लोराईड (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मेटालीक्सील ८ % + मॅन्कोझेब ६४ % (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) या प्रमाणातफवारणी करावी. |

**पशुधन विषयक निहाय सल्ला:**

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| म्हैस | • जनावरांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी रात्रीच्या वेळी जनावरांना गोठ्यामध्ये/सुरक्षित ठिकाणी ठेवावे. जनावरांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी ४ ते ६ इंच जाडीचे भाताचा पेंढा, गव्हाचा पेंढा, करावातीचे धूळ इत्यादीचे बेडिंग करावे. जनावरांच्या गोठ्याचा व जमिनीचा भाग कोरडा व स्वच्छ ठेवावा. जनावरांना पिण्यासाठी २४ तास स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी. जनावरांच्या पाण्याची कुंड/ साधने याची आठवड्यातून एकदा स्वच्छता करावी. उत्पादकता व प्रजनन वाढीच्या दृष्टीने जनावरांना दररोज ३० ते ४० ग्राम मिनरल मिक्श्चर द्यावे. |
| गाय | • जनावरांना पायखुरी – तोंडखुरी रोगाविरुद्ध लस टोचावी. |

**कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:**

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| पक्षी | • पक्षी शेडमध्ये दोन्ही बाजूंच्या जाळ्यांना पडदे लावून रात्री व पहाटे थंड हवेच्या वेळी बंद करावे उन्हाच्या वेळी दुपारी पडते उघडावेत. • पक्षीगृहात तापमान नियंत्रणाची सोय असावी. • पक्षी घरातील तापमान २१ ते ३० अंश सेल्सिअस पर्यंत नियंत्रित राहणे आवश्यक असते त्यामुळे शेडमध्ये विजेचे बल्ब, शेगडी किंवा ब्रुडर चा वापर करावा. • हवामानातील बदलामुळे पक्षांवर ताण येऊ नये म्हणून त्यांच्या आहारात इलेक्ट्रॉलाइट्स, जीवनसत्वे इत्यादींचा वापर करावा. • अति थंडीमुळे हवेतील आद्रता वाढून पक्षांची गादी, खाद्य यामध्ये बुरशीची वाढ होऊन पक्षांना श्वसनाचे रोग होण्याची दाट शक्यता असते त्यामुळे पक्षी घरातील गादी स्वच्छ व कोरडे राहील याची खबरदारी घेण्यात यावी. • पक्षांना पिण्यासाठी कोमट पाणी पुरवावे. • ऊर्जेची गरज वाढल्यामुळे आवश्यकतेनुसार पोषण तज्ञाच्या सल्ल्याने खाद्य तयार करून घ्यावे. • वेळापत्रकानुसार लसीकरण करून घ्यावे. • पुरेसा औषधी साठा, क्षार मिश्रणे व जीवनसत्वे यांचा साठा ठेवावा. |

**इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:**

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. * संशोधनावर आधारित शिफारस. दोन किंवा त्यापेक्षा अधिक रसायने किंवा संजीवके एकत्र मिसळू नये. |
| सामान्य सल्ला | • शिफारशीनुसार या महिन्यात भेंडी, गवार, चवळी, काकडी, दुधी भोपळा, कासेफळ, दोडका, कारली, ढेमसे, टरबूज, खरबूज, पालक, मुळा, मेथी आणि कोथिंबीर याची लागवड करावी. ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धतीने ओलीत व्यवस्थापन करावे. |